



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २७५, शुक्रवार १९ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यतामध्ये खा. लंके पुन्हा अव्वल!

### ■ दोन वर्षात १ कोटी ५३ लाखांची मदत
### ■ राज्यात सर्वाधिक मदत मिळवून देणारे लोकप्रतिनिधी

**पारनेर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत मतदारसंघासह राज्यातील गरजू रूग्णांना मदत मिळवून देण्यात राज्यातील लोकप्रतिनिधींमध्ये खासदार नीलेश लंके हे यंदाही अव्वल ठरले आहेत.**

१ जुलै २०२२ ते १ जुलै २०२४ या कालावधीमध्ये खा. नीलेश लंके यांनी विविध आजारांनी त्रस्त असलेल्या १४९ रूग्णांना १ कोटी १५ लाख ७२ हजार रूपयांची मदत मिळवून दिल्याची माहिती मुख्यमंत्री सचिवालयाच्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे यांनी दिली. गेल्या वर्षीही खा. लंके यांनी विविध रूग्णांना सर्वाधिक मदत मिळवून दिली होती.

सर्वसामान्यांमध्ये मिसळून काम करणाऱ्या खा. लंके यांच्याकडे दररोज विविध प्रकारच्या मदतीसाठी राज्यभरातून लोक येतात. विविध आजारांवरील उपचारासाठी रूग्ण किंवा त्यांचे नातेवाईक आल्यानंतर मदतीसाठी सुरूवातीस मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा विचार केला जातो. या योजनेमध्ये सबंधित रूग्णाचा आजार बसत नसेल तर विविध धर्मदाय रूग्णालयांशी संपर्क करून त्या रूग्णास वैद्यकिय मदत मिळवून दिली जाते. मतदारसंघाबरोबरच विविध जिल्हयांतून खा. लंके यांच्याकडे लोक मदत मागण्यासाठी येतात. खा. लंके हे त्यांचे सर्व कसब पणाला लावून सबंधित रूग्णास मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करतात.

विविध रूग्णांना वैद्यकिय मदत मिळवून देण्यासाठी खा. लंके यांच्या पारनेर येथील संपर्क कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापण्यात आला असून या कक्षाचे प्रमुख अनिल चौधरी हे विविध आजारांचे वर्गीकरण करून ते प्रस्ताव सबंधित विभागाकडे पाठवितात. प्रस्ताव पाठविल्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्यात येतो. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर संबंधित रूग्णाच्या नातेवाईकांशी संपर्क करून मदत मंजुर झाल्याची माहीती दिली जाते. संबंधित मदतीची रक्कम थेट त्या त्या रूग्णालयांच्या खात्यावर थेट वर्ग करण्यात येते.




### हे तर माझे कर्तव्य

सन २०१९ मध्ये आमदार म्हणून तर सन २०२४ मध्ये खासदार म्हणून मायबाप जनतेने मला निवडूण दिले. ही पदे मिरविण्यासाठी नसून जनतेच्या सेवेसाठी आहेत. त्यामुळे माझ्याकडे मदतीसाठी आलेल्या व्यक्तीची, त्याच्या नातेवाईकाची तो कोणत्या पक्षाचा, पार्टीचा अथवा मतदारसंघातील अथवा मतदारसंघाबाहेरील आहे याची कधीही चौकशी केली नाही. माझ्या परीने मी प्रत्येकाला मदत करण्याचा आजवर प्रयत्न केला. मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष तसेच इतर धर्मदाय रूग्णालयांच्या माध्यमातून जास्तीत जास्त रूग्णांना कशी मदत मिळेल याची मी व माझे सहकारी दक्षता घेतात. यापुढील काळातही ही सेवा सुरूच राहील.

खा. नीलेश लंके

### कोरोना काळातील सेवेमुळे आरोग्यदुत म्हणून ओळख

जगभरात कोरोना महामारीने थैमान घातल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी कोरोना बाधितांची केलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. पहिल्या लाटेत राज्यात, परराज्यात जाणा-या वाटसरूंसाठी, मतदारसंघातील हातावर पोट असणाऱ्या नागरिकांसाठी अन्न छत्र सुरू केले. अनेक वाटसरूंना त्यांच्या घरी पोहचविण्याची व्यवस्था केली. पहिल्या लाटेत शरद पवारांच्या नावाने आरोग्य मंदिर सुरू करून कोरोना बाधितांच्या उपचाराची मोफत सोय केली. दुसऱ्या लाटेत १ हजार १०० बेडचे आरोग्य मंदिर सुरू करून तीस हजारांहून अधिक कोरोना बाधितांच्या उपचाराची सोय केली. या कालखंडात खा. लंके यांनी केलेले काम अधोरेखीत झाले आणि आरोग्यदुत म्हणून त्यांची ओळख झाली. त्यानंतर विविध आजारांसाठी मदत मिळावी यासाठी राज्यभरातील रूग्ण व त्यांचे नातेवाईक लंके यांच्याशी संपर्क करू लागले. त्यातूनच विविध मार्गाने रूग्णांना मदत मिळवून देण्यात खा. लंके हे अव्वल ठरले.

### अनेकांकडून कृतज्ञता

कोरोना संकटात खा. लंके यांच्यामुळे जीवदान मिळालेले अनेक जण लंके यांची भेट झाल्यानंतर कृतज्ञता व्यक्त करतात. ज्यांना वेगवेगळया मार्गाने वैद्यकिय मदतीचा लाभ झाला आहे असे रूग्णही लंके यांना विसरत नाहीत. राज्यात कुठेही कार्यक्रमासाठी खा. लंके हे गेले असताना कुठली तरी मदत मिळाली म्हणून लंके यांची आवर्जुन भेट घेणारे नागरीक हमखास पहावयास मिळतात.

## मनोरमा खेडकर यांना अखेर अटक

### ■ महाडमधून पोलिसांनी घेतले ताब्यात
### ■ २० जुलै पर्यंत पोलीस कोठडी

**पुणे: प्रतिनिधी**



**आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांना अखेर अटक करण्यात आली आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा खेडकर यांना महाड येथून अटक केली आहे. शेतकऱ्यांना बंदूक दाखवत धमकावल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता, त्याचप्रकरणात त्यांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, खेडकर यांना न्यायालयापुढे उभे केले असता न्यायालयाने २ दिवस पोलिस कोठडी देण्यात आली.**

मनोरमा खेडकर यांना महाडमधील हॉटेलमधून अटक करण्यात आली असून सध्या स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद करून पोलिस त्यांना पुण्याला घेऊन येत आहेत. मनोरमा खेडकर यांना पुण्यात आणल्यानंतर त्यांची चौकशी केली जाईल.

पुणे ग्रामीण पोलीस गेल्या काही दिवसांपासून मनोरम खेडकर यांचा शोध घेत होती. त्यांच्या पाथर्डी येथील गावी, मुंबई, पुण्यात त्यांचा शोध घेतला जात होता. त्या महाडमधील एका हॉटेलमध्ये लपून बसल्याची माहिती पोलिसांनी मिळाली, तिथून त्यांना अटक करण्यात आली आहे.

मनोरमा खेडकर यांच्यावर शेतकऱ्याला बंदुक दाखवत धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून त्या फरार होत्या. पोलीस त्यांचा शोध घेत होते. मनोरमा या महाड येथील एका हॉटेलमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पुणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने पहाटे या हॉटेलवर धाड टाकली आणि मनोरमा यांना ताब्यात घेतलं. त्यानंतर त्यांना पुण्याला आणलं जाणार आहे.

पूजा खेडकर यांच्यासह त्यांची आई मनोरमा खेडकर आणि वडील दिलीप खेडकर हे देखील चर्चेत आहेत. मनोरमा खेडकर यांचा एक व्हिडिओ समोर आला होता, ज्यामध्ये त्या बंदुकीचा धाक दाखवत शेतकऱ्याला धमकावताना दिसत होत्या. पुण्यातील मुळशी येथील धडवली गावात मनोरमा खेडकर यांनी २५ एकर जमीन खरेदी केली होती. त्या जमिनीच्या बाजूची जागी देखील त्यांनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. यावर जेव्हा ताय जमिनीच्या मालकाने याला विरोध केला तेव्हा मनोरमा खेडकर यांनी त्यांच्याशी वाद घातला. इतकंच नाही तर मनोरमा खेडकर यांनी शेतकऱ्याला बंदूक दाखवत त्याला धमकावलं. ही जागा ताब्यात घेण्यासाठी त्या बाउन्सर देखील घेऊन गेल्या होत्या.

त्यानंतर याप्रकरणात मनोरमा खेडकर यांच्यावर ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर चौकशीसाठी पोलीस त्यांच्या बाणेर येथील घरी गेले, पण तिथे कुणी दार उघडलं नाही. त्यानंतर पोलिसांनी मनोरमा यांचा शोध सुरु केला. त्यानंतर गुरुवारी पहाटे त्यांना महाड येथील एका हॉटेलमधून ताब्यात घेण्यात आले.

## विधानसभेला मविआलाच जनतेचा कौल मिळेल

### ■ जयंत पाटलांचा दावा ■ तिन्ही पक्षात चर्चा करुन जागा वाटपाचा निर्णय

**सातारा : प्रतिनिधी**



**विधानसभा निवडणुकीतही जनतेचा कौल महाविकास आघाडीला राहील. तिन्ही पक्षात चर्चा करुन जागा वाटपाचा निर्णय होईल. सातारा जिल्ह्यातही मागीलपेक्षा चांगली स्थिती आघाडीची राहील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर विशाळगडावरील अतिक्रमाणाला विरोध आहे. पण, पावसाळ्यात हे काम केले. यामध्ये राज्य शासन अपयशी ठरले आहे, असा आरोपही त्यांनी केला.**

दरम्यान प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, राज्यातील विधानसभा मतदारसंघाचा दौरा सुरू उर्वरीत पान ३ वर

## बारसकर महाराजांची कार जळाली की जाळली?

### ■ आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपुरात घडली होती घटना
### ■ मनोज जरांगेसोबत झाला होता वाद

**पंढरपूर : प्रतिनिधी**

**मनोज जरांगे यांना विरोध करणाऱ्या अजय महाराज बारसकर यांची गाडी पंढरपूरमध्ये जळाली आहे. बारसकर यांना दोन दिवसांपासून धमक्या येत असल्याने गाडी जळाली की जाळली याचा शोध पोलिसांना घ्यावा लागणार आहे. मराठा आरक्षण आंदोलनातील नेते मनोज जरांगे पाटील यांना विरोध करणारे त्यांचे पूर्वीचे सहकारी अजय महाराज बारसकर यांची कार आषाढी एकादशीच्या पहाटे जळाल्याने चर्चेला उधाण आले आहे.**

दरम्यान पंढरपूर येथे ६५ एकरच्या पार्किंगमध्ये आपले वाहन



लावून ते चंद्रभागेतील स्नानासाठी गेले. त्यानंतर त्यांना गर्दीमुळे पार्किंग मध्ये पोहोचता आले नाही. १७ तारखेला दुपारनंतर ते आपल्या वाहनाजवळ पोहोचले असता त्यांना वाहन जाळलेले दिसले. याबाबत त्यांनी पंढरपूर पोलिस स्टेशनला खबर दिली आहे.

**केव्हा घडली घटना?**

परवा मध्यरात्री ते काल दुपारच्या दरम्यान गाडी अज्ञाताने जाळल्याचा प्रकार समोर आला आहे. भटुंबरे गावातील पंडीत शेंबडे यांच्या शेतात पार्क केली अजय बावस्कर यांची गाडी पेटवून दिल्याचा धक्कादायक प्रकार घडला. त्यानंतर अजय महाराज बावस्कर यांनी पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिस गाडी कोणी जाळली याचा शोध घेत आहेत.

**धमकी येत असल्याचा आरोप**

बारसकर यांनी दोन दिवासपूर्वी पंढरपुरात येण्या आधी आपल्याला धमकी येत असल्याचा आरोप करत व्हिडिओ सोशल मिडीयावर शेअर उर्वरीत पान ३ वर

## माळशेज घाट मनमोहक धबधब्यांनी बहरला !

### गर्द झाडी, दाट धुक्यामुळे पर्यटकांना आकर्षण

**ओतूर : प्रतिनिधी**

**नगर-कल्याण महामार्गावरील पुणे, ठाणे, अहमदनगर या तीन जिल्ह्यांच्या सीमा रेषेवरील सह्याद्रीच्या पर्वतरांगेत असलेला माळशेज घाट हा पर्यटकांचे प्रमुख आकर्षणाचे ठिकाण आहे. दाट धुके, गर्द झाडी, झाडीतून पक्षांची ऐकू येणारी किलबिल, फेसाळत हजारो फुटांवरून कोसळणारे धबधबे, अशा निसर्ग सौंदर्याने माळशेज घाट नटलेला आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वर्षाविहारासाठी हा घाट पर्यटकांना आकर्षित करत आहे.**



सध्या माळशेज घाटातील धबधबे पूर्ण क्षमतेने अजून वाहत नसले तरी, आल्हाददायक वातावरण व सर्वत्र पसरलेली हिरवळ, छोट्या प्रमाणात वाहत असलेले धबधबे या सर्वांनी उर्वरीत पान ३ वर

## एलसीबीचे पोलीस निरीक्षक आहेर यांच्या मालमत्तेची चौकशी करा

### ■ मकासरे यांची एसीबीच्या पोलीस महासंचालकांकडे मागणी
### ■ खा.लंके यांनीही केली होती मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**राहुरी : प्रतिनिधी**



**अहमदनगर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मालमत्तेची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राहुरी येथील सामाजिक कार्यकर्ते विजय मकासरे यांनी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस महासंचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

मकासरे यांनी पाठविलेल्या निवेदनात म्हटले की, अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांचे विरोधात अनेक राजकीय तसेच सामाजिक काम करणाऱ्या लोकांनी हप्ते घेण्याबाबत तक्रारी केलेल्या आहेत. तसेच नगर दक्षिणचे खासदार नीलेश लंके यांनी याबाबत मुख्यमंत्री, गृहमंत्री,पोलीस










फॅशन | संसार | सौंदर्य
**सखी**



# संबळपुरी साडी नेमकी आली कुठून?

**बांधा किंवा इकत या नावाने प्रसिध्द असलेली संबळपुरी साडी मूळची ओडिसाची आहे. चार मीटर ते नऊ मीटरपर्यंत मिळणारं हे कापड ओडिसातील महिला विविध प्रकारांनी नेसतात. संबळपुरी साडी पाचवारी पध्दतीने नेसली जाते. संबळपुरी साडी ही ओडिसातील मुख्यत: सोनेपुर, संबळपुर, बालंगीर या ठिकाणी विणली जाते. हातमागावर विणलेल्या या साडीची खासियत आहे बांधकला. यामध्ये धागे रंगाच्या पाण्यात ठेवले जातात. नंतर या रंगीत धाग्यांनी कापड विणले जाते. या विणकामाची खासियत म्हणजे विणल्यानंतर कापड दोन्ही बाजूंनी सारखेच दिसते. ही साडी कॉटन व सिल्क या दोन्ही प्रकारात मिळते. त्यामुळे ज्यांना कॉटनच्या साड्या वापरण्याची आवड आहे त्यांनाही उत्तम पर्याय उपलब्ध असतो.**

## कसे असते नक्षीकाम



संबळपुरी साडीवर अजूनही पारंपारिक नक्षीकाम केले जाते. यामध्ये शंख, चक्र, फुले इत्यादींची नक्षी असते. हे विणकाम इतके सुबकतेने केलेले असते, की पहिल्यांदा पाहिल्यावर नक्षी छापली आहे असा भास होतो. विणकामाचे ठिकाण आणि नक्षीकाम यावरून साडीचे विविध प्रकार पडतात. जसे की, सोनेपुरी, पसपली, बोमकाइ, बापटा आदी. धागे रंगवून मग विणण्याच्या या पध्दतीमुळे संबळपुरी साडीचा रंग खूप वर्षे टिकून राहतो. त्यामुळे घरच्या घरीच साबणाच्या पाण्यात धुतली तरी चालते. रंग जात नसल्यामुळे इतर हलक्या रंगाच्या साड्यांसोबत ठेवली तरी चालते. या साडीची किंमत पाचशे ते सहाशे रुपयांपासून सुरू होऊन काही हजार आणि अगदी लाखांपर्यंतही जाते. कॉट्न व सिल्क धाग्यांच्या गुणवत्तेनुसार आणि नक्षीकामानुसार साडीची किंमत ठरवली जाते.

## काळजी कशी घ्याल ?

इतर सिल्कच्या साड्यांप्रमाणेच या साड्या सुती कपड्यांमध्ये बांधून ठेवाव्यात. साडी हँगरला ठेवण्यापेक्षा अशी ठेवल्यास ती जास्त चांगली राहते. हल्ली साड्या नेसण्याचे प्रमाण कमी झाल्याने दिर्घकाळ साड्या वापरात येत नाहीत अशावेळी साडी पडून राहील्यास घडीला विरू शकते. त्यामुळे साड्यांच्या घड्या बदलून ठेवाव्यात. ही साडी थंड पाण्यात हलकीशी पावडर टाकून हाताने धुवावी किंवा ड्रायक्लीनला टाकावी. उन्हाने रंग फिका पडण्याची शक्यता असल्याने शक्यतो कोणत्याच साड्या उन्हात वाळवू नयेत.

# महागड्या सिल्क साड्यांचा रंग जातोय?


**सिल्कच्या साड्या अत्यंत सुंदर, नाजूक आणि महागड्या असतात. अनेक महिला सिल्क साडी परिधान करण्याला पसंती देतात. या इतक्या सुंदर असतात की त्या पार्टी किंवा कार्यक्रमामध्ये वापरल्या जातात. पण सिल्क साड्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. जेणेकरून ती खराब होऊ नये. त्यांचा कापड, रंग आणि डिझाईन इत्यादी फिके आणि खराब होऊ नये म्हणून महिलांना साड्यांची जास्त काळजी घ्यावी लागते. सिल्कच्या साड्या कशा ठेवाव्यात, जेणेकरून त्या कशा धुतल्या पाहिजे आणि कशा हाताळल्या पाहिजे हे सर्व तुम्ही येथे जाणून घेऊ शकता...**

## सिल्क साडी कशी हाताळावी ?

- सिल्क साडी कपाटात ठेवण्यापूर्वी धूवून घ्या. तुम्ही घातलेली सिल्क साडी कपाटात बंद करून ठेवली असेल तर तसे करू नका. यामुळे, तिची चमक कमी होईल आणि साडी लवकर खराब होऊ शकते. ते कपाटात ठेवण्याआधी ते पूर्णपणे धूणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून ती जास्त काळ चांगली राहील.
- काही स्त्रिया कपाटात हँगर्सवर साड्या लटकवतात. कॉटन, जॉर्जेट आणि शिफॉनच्या साड्या तुम्ही नक्कीच लटकवू शकता, पण सिल्कच्या साड्या कपाटात जास्त वेळ लटकवणं टाळा. यामुळे साडी खराब होऊ शकतात. तुम्ही ते एक-दोन दिवस हँगरमध्ये लटकवा, पण लोखंडीऐवजी प्लास्टिकच्या हॅन्गरमध्ये लटकवा.
- तुम्ही सिल्कची साडी नेसून पार्टीला गेला असाल तर घरी आल्यावर लगेच कपाटात ठेवू नका. घामामुळे, ओलाव्यामुळे साडी खराब होऊ शकते आणि डागही पडतात. प्रथम काही वेळ पंख्याखाली उघड्यावर ठेवा.
- घरातील सिल्क साडी कधीही वॉशिंग मशीन किंवा साबणाने धुवू नका. ते नेहमी ड्राय क्लीन करून घ्या. यामुळे त्याचे फॅब्रिक, रंग, डिझाइन आदी खराब होणार नाही. शिवाय, ते बऱ्याच काळ नव्यासारखे दिसेल. चमक देखील कायम राहील.
- सुरकुत्या टाळण्यासाठी, साडीच घडी घालताना नेहमी ॲसिड-फ्री टिश्यू पेपर ठेवा. नियमित टिश्यू पेपर वापरणे टाळा. कारण त्यात आम्ल असू शकते, ज्यामुळे फॅब्रिक खराब होऊ शकते.
- प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये रेशमी साड्या कधीही ठेवू नका. यासाठी कापडापासून बनवलेली पिशवीच वापरावी. या साड्या तुम्ही कॉटनच्या पिशव्या आणि कव्हरमध्येही ठेवू शकता. प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये ओलावा साचल्याने बुरशी येऊ शकते. यामुळे तुमची महागडी सिल्क साडी खराब होऊ शकते.
- थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असलेल्या ठिकाणी सिल्क साडी ठेवण्याऐवजी, अंधाऱ्या आणि थंड ठिकाणी ठेवा. सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्यामुळे रंग फिकट होण्याची शक्यता वाढते. साड्यांची कपाटात ठेवताना वेळोवेळी बाजू फिरवत राहा, जेणेकरून कायमस्वरूमी घडी घातल्याच्या खुणा राहणार नाहीत.
- कपाटात ठेवलेल्या तुमच्या सिल्क साड्यांना बुरशी आणि किडे येऊ नयेत असे वाटत असेल तर साडीच्या मध्यभागी कडुनिंबाची पाने आणि देवदाराचे गोळे ठेवू शकता. सिल्क साड्यांमध्ये नॅप्थालीनचे गोळे (मॉथबॉल) ठेवू नका, कारण त्यात हानिकारक रसायने असतात.
- महागड्या सिल्क साड्या नेहमी व्यावसायिकांकडून स्वच्छ करा. जर तुम्ही ड्राय क्लीनिंग करत असाल, तर ते एखाद्या चांगल्या ठिकाणाहून करा ज्याला नाजूक कापड व्यवस्थित कसे हाताळायचे हे माहित आहे.
- जर एक लहान डाग काढण्यासाठी साडी धुण्याची आवश्यकता असेल तर फक्त सौम्य डिटर्जंट वापरा जो खास मऊ, नाजूक कापडांसाठी बनवला जातो. थंड पाण्यात हलक्या हाताने साडी बुडवा आणि ती पिळणे टाळा.



# सायलीचा कॉटन साडीतील मनमोहक लूक



**सायली संजीवने मालिक आणि चित्रटातून अनेकांचे मन जिंकून घेतले आहे. ती नेहमीच सोशल मीडियावरही सक्रिय असते. सायलीने नुकतेच निळ्या रंगाच्या कॉटन साडीतील फोटो पोस्ट करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. साधेपणा आणि सौंदर्याचा उत्तम मेळ म्हणजे सायली संजीव असेच म्हणावे लागेल. 'साडी नेसणं म्हणजे आनंद' अशी कॅप्शन पोस्ट करत तिने या साडीतील अनेक लुक शेअर केले आहेत, तर तिच्या या लुकमुळे तिचे चाहते भान हरपून बसले आहेत. तर तिच्या चाहत्याने तिच्या या लुककडे पाहून म्हटलंय, 'लवकर गूड न्यूज देऊन टाक कोण आहे तो ज्यासाठी हरपून बसली आहेस'. सध्या सगळीकडे लग्नाचे वारे वाहत आहेत, त्यामुळे सायलीदेखील आता आपल्या आयुष्यातील जोडीदार कोण आहे हे कोडं उलगडणार का ? असा प्रश्न चाहत्यांना पडलाय.**

- प्रिंटेड कॉटन साडी : कॉटन साडी म्हणजे नेसायला अत्यंत हलकी पण दिसायला रॉयल. सायलीने नेसलेली ही कॉटन साडी असा लुक देत आहे. यावर पक्ष्यांचे प्रिंटिंग करण्यात आले असून काठाला गोल्डन बॉर्डर देण्यात आली आहे. उन्हाळ्यात फॅशन करण्यासाठी सायलीची ही स्टाईल परफेक्ट ठरेल.
- चिकनकारी ब्लाऊज : या साडीसह डीप नेक चिकनकारी ब्लाऊज सायलीने मॅच केला आहे. जो अत्यंत स्टायलिश आणि क्लासी दिसून येत आहे. सध्या चिकनकारी व्हाईट ब्लाऊजची फॅशन अधिक ट्रेंडमध्ये आहे. कॉटन चिकनकारी ब्लाऊज अशा साडींसह मॅच करणे अधिक फॅशनेबल दिसते. सायलीची ही स्टाईल खूपच छान झाली आहे.
- मोकळ्या केसांची स्टाईल : सायलीने यासह आपले स्ट्रेट असणारे केस मोकळे ठेवले आहेत आणि त्याला खालून कर्ल लुक दिला आहे. तसंच हायलाईट केलेले तिचे केस अधिक सुंदर आणि आकर्षक दिसत आहेत. तिच्या या लुकमुळे चाहते सध्या तिच्यावर अधिक फिदा झालेले दिसून येत आहे. तुम्हीही एखाद्या साध्याशा कार्यक्रमासाठी अशी कॉटनची साडी निवडू शकता.
- ऑक्सिडाईज्ड कानातले : सायलीने यासह हेव्ही ऑक्सिडाईज्ड कानातले घातले असून निळ्या साडीसह याचा परफेक्ट स्टायलिश लुक दिसून येत आहे. या कानातल्यांना खाली पांढरे मोती जोडण्यात आले असून निळ्या पांढऱ्या साडीच्या कॉम्बिनेशनसह याची शोभा अधिक वाढली आहे. तर सायलीने केवळ कानातले घालत हा लुक पूर्ण केलाय.
- सटल मेकअप : सायलीने यासह अगदी सटल मेकअप केलाय. फाऊंडेशन, काजळ आणि थोडासा स्मोकी आईज लुक, कपाळावर लहानशी टिकली, चिक हायलायटर आणि न्यूड लिपस्टिक असा तिचा लुक खूपच आकर्षक आणि लोभसवाणा दिसून येत आहे. साडीसह हा मेकअप अगदी परफेक्ट जुळून आलाय आणि त्यामुळे सायलीच्या सौंदर्यात भर पडली आहे.

# चंदेरी साडी





**मध्य प्रदेशमधील अशोकनगर जिल्ह्यातील 'चंदेरी' शहर ऐतिहासिक ठिकाणांसाठी प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे तिथे विणल्या जाणाऱ्या चंदेरी साडीसाठी देखील. ऐतिहासिक नोंदीनुसार चंदेरी ही शिशुपाल राजाच्या राज्याची राजधानी होती. चंदेरी विणण्याची ही कला तेराव्या शतकात राजा शिशुपालाच्या राजकाळात प्रसिद्ध झाली. सुरुवातीला कारागीर मुख्यतः मुस्लिम असत, इ.स.१३५० च्या सुमारास कोष्ठी कारागीर झाशीहून चंदेरी गावात स्थलांतरित झाले. मूळची नऊवारी असलेल्या चंदेरी साडीच्या दोन्ही बाजूला पदर असतात. चंदेरी साडी तीन प्रकारच्या कापडात विणली जाते. सिल्क, चंदेरी कॉटन, कॉटन-सिल्क आदी चंदेरी विणण्याची ही कला फार पूर्वीपासून पिढ्यान पिढ्या चालत आलेली आहे. काही वेळेला रेशमासोबत जरीदेखील विणकामात वापरली जाते. त्यामुळे साडीला चमक येते...**

- नक्षीकाम : नाजूक नक्षीकाम, कमी प्रमाणातले जरी काम आणि पातळ विणकाम ही चंदेरी साडीची खासियत आहे. काठा-पदरावर सोन्याच्या व चांदीच्या धाग्यांनी जरीकाम आणि भरतकाम केलेले असते. चंदेरी साडी ही तिच्या सुबक नक्षीकामासाठी प्रसिद्ध आहे. नाणी, फुले, मोर यांसारखे नक्षीकाम पदरावर केलेले असते. पदरावरचे काठ विरुद्ध दिशेला विणलेले असतात किंवा फक्त एक छोटी पट्टी विणलेली असते. काठाच्या नक्षीकामावर बनारसी साडीचा प्रभाव जाणवतो. त्यामध्ये झालर, मीनाकारी, फूल-बुट्टी, कैरी हे प्रकार असतात. भरतकाम आणि जरीकामात मुघल राजवटीचा प्रभाव जाणवतो. १९७० च्या सुमारास चंदेरीच्या नक्षीकामात बदल झाले. गंगा-जामनी, मेहंदी रंगे हाथ, सदा सौभाग्यवती भव यांसरखे काठ महिलांमध्ये खूप प्रसिद्ध झाले.
- रंग : नावाप्रमाणेच चंदेरी साडी चंदेरी रंगात मिळते. चंदेरी साडी ही पांढऱ्या व हलक्या रंगातही विणली जाते. बदलत्या काळानुसार ही साडी लाल, काळ्या, निळ्या अशा गडद रंगातही मिळते. लाल रंगात विणल्या जाणाऱ्या साडीला 'आसावली' म्हणतात. मूळ हातमागावर विणलेल्या चंदेरीची किंमत ५००० पासून सुरू होते. चंदेरी कापडाची ओढणी, कुर्ता देखील १५०० हजारापर्यंत मिळते. साडीची किंमत नक्षीकाम आणि जरीकामावर अवलंबून असते.

## खरी चंदेरी साडी कशी ओळखाल

- नक्षीकाम हे विशेषतः सोने, चांदी किंवा तांब्याच्या पावडरीचे आवरण वापरून हातमागावर विणलेले असते.
- हातमागावर विणलेल्या चंदेरी साडीचा पृष्ठभाग नेहमी खाली वर असतो.
- हातमागावर विणलेल्या साडीचे नक्षीकाम उठून दिसते, तर मशीनवर विणलेल्या साडीचे नक्षीकाम वापरानुसार निघून येते.



## काळजी कशी घ्यावी ?

थंड पाण्यात अगदी थोडी पावडर वापरून साडी धुवावी. साडी उलट्या बाजूने सावलीत वाळत घालावी. इस्त्री देखील उलट्या बाजूने करावी. साडीची व्यवस्थित घडी करून ठेवावी. दोन्ही बाजूंना पदर असलेल्या या साडीची ओढणी बनवून पंजाबी ड्रेस वर घालता येते. साडीवरच्या नक्षीकाम आणि जरीकामामुळे अनारकली देखील उत्तम दिसेल. साडीवर भरजरी दागिने खुलून दिसतात.

## शॉर्ट न्यूज

### कोपरगाव जिल्हा करण्याची मागणी

**कोपरगाव :** १५ ऑगस्टपूर्वी शासनाने नवीन जिल्हा जाहीर करावा, अशी मागणी काही तालुक्यांतून होत आहे. त्यासाठी गावे बंद ठेवली जात आहेत. मेरिट व नागरिकांच्या सोयीचा विचार केल्यास कोपरगाव हेच नवीन जिल्ह्याचे ठिकाण होण्यासाठी योग्य आहे. जिल्हा विभाजन होणार असेल, तर कोपरगावच जिल्हा करावा, अशी मागणी माजी नगराध्यक्ष मंगेश पाटील यांनी केली आहे. सर्वात महत्त्वाचे समृद्धी महामार्ग, कोपरगाव तालुक्यात काकडी येथे विमानतळ आहे. दळणवळणासाठी, व्यापार वाढीसाठी कोपरगाव हे ठिकाण अत्यंत योग्य आहे. नूतन एमआयडीसी प्रस्तावित आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण करणारा गजाआड

**राहुरी :** काही दिवसांपूर्वी राहुरी येथील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्यात आले होते. याबाबत राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी प्रशांत प्रवीण भोसले याच्यावर अपहरणचा गून्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून पोलिस पथक आरोपी व पिडीत मुलीचा शोध घेत होते.आरोपीचा सुगावा लागताच पोलिस पथकाने आरोपी प्रशांत प्रवीण भोसले नाशिक रोड पोलिस ठाणे हद्दीतून ताब्यात घेतले. आरोपीच्या तावडीतून पिडीत मुलीची सुटका करूनतीला तीच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले. या घटनेचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक धर्मराज पाटील हे करीत आहेत.

### मालवाहू वाहनाच्या धडकेत एक ठार

**नेवासा :** तालुक्यातील उस्थळदुमाला शिवारात नगर-संभाजीनगर महामार्गावर मालवाहू वाहनाने मोटारसायकलला दिलेल्या धडकेत भानसहिवरा येथील तरुणाचा मृत्यू झाला तर त्याची पत्नी जखमी झाल्याची घटना घडली. याबाबत माहिती अशी की, भानसहिवरा येथील कृष्णा संभाजी भणगे हे पत्नीसह बह्र्हाणपूर येथे बहिणीला भेटण्यासाठी त्याच्या यामाहा मोटारसायकलवर गेले होते. येथे घरी परतत असताना उस्थळ फाट्याजवळ टाटा कंपनीच्या पांढऱ्या रंगाच्या मालवाहू वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत कृष्णा भणगे हे जागीच ठार झाले.

### साईचरणी ११ किलो चांदीचे दोन दंड अर्पण

**शिर्डी :** एका साईभक्ताने साईचरणी ९ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ११ किलो चांदीचे २ दंड अर्पण केले. या दंडांचा श्रींचे आरतीच्यावेळी ललकारीसाठी वापर करणेत येणार आहे. हे दंड अतिशय सुंदर असून दानशूर साई भक्ताने संस्थानला आपले नाव जाहीर न करण्याची विनंती केली आहे. ११ किलो चांदीचे २ दंड साईबाबा संस्थानला देणगी स्वरुपात दिल्यानंतर त्यांचा साईबाबा संस्थानच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सत्कार केला.

### पंकजा मुंडेना अडचणीत आणण्याचे षड्यंत्र

**पाथर्डी :** लोकनेत्या पंकजा मुंडे यांच्या विषयी प्रसार माध्यमातून काही विघ्नसंतोषी व विरोधकांनी खोट्या बातम्या देवून त्यांना अडचणीत आणण्यासाठी खटाटोप चालविलेला आहे. त्यावर आमदार मोनिका राजळे यांनी आपली भूमिका मांडतांना हे स्पष्ट केले की, या खोटया प्रचारात कोणतेही तथ्य नसून लोकनेत्या पंकजा मुंडेना ट्रोल करण्याचे षडयंत्र आहे. खेडकर दापत्याने आ. पंकजा मुंडे यांना मदत म्हणून बारा लाखाचा चेक दिला व लोकसभेची उमेदवारी मिळण्यासाठी मोहटादेवीला चांदीचा मुखवटा अर्पण केला.

# दूध प्रक्रिया केंद्रांनी अतिरिक्त दूधाचे संकलन करावे

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यातील अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी अमुल उद्योग समुहासह इतरही प्रक्रिया केंद्रानी अतिरिक्त २० लाख लिटर दूधाचे संकलन करावे असे आवाहन दूग्ध व्यवसाय विकास मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे. या प्रक्रिया केंद्रानी सहकार्य केल्यास राज्यातील दूध उत्पादकांना ३५ रुपये भाव देणे शक्य होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**



राज्य सरकारने दूधाच्या दरासंदर्भात घेतलेला निर्णय राज्यात तातडीने लागू करता यावा यासाठी मंत्री विखे पाटील यांनी विशेष प्रयत्न सुरु केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने राज्यासह बाहेरच्या राज्यात जाणाऱ्या दूधाला सुध्दा शासनाने लागू केलेले दर मिळावेत यासाठी मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृहात दूध व्यवसायिक आणि सर्व प्रक्रिया केंद्राच्या प्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला अमुल, पंचमहाल, युनियन, कैरा युनियन, वलसाड, सुमूल आणि भरुज येथील युनियनचे प्रतिनिधी यांच्यासह दूग्ध व्यवसाय विकास विभागाचे आयुक्त प्रशांत मोहोड आणि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी या सर्व प्रतिनिधींशी संवाद साधताना दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३-५, ८-५ फॅटसाठी शासनाने ठरवून दिलेला ३५ रुपयांचा दर लागू करावा असे आवाहन केले. दर लागू करण्यासाठी काही अडचणी असल्यास विभागाकडून सोडविण्यासाठी निश्चित पुढाकार घेतला जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली. ज्याप्रमाणे राज्यातील प्रक्रिया केंद्राना दूध पावडर उत्पादनासाठी दिले जाणारे अनुदान परराज्यातील प्रक्रिया केंद्रानाही मिळावे अशी मागणी उपस्थित प्रतिनिधींनी केल्यानंतर याबाबत सरकार सकारात्मकतेने विचार करेल असे त्यांनी सांगितले.

सद्य परिस्थितीत राज्यात अतिरिक्त दुधाचा प्रश्न निर्माण झाल्याने यावर तोडगा काढण्यासाठी प्रक्रीया केंद्रानी २० लाख लिटर दूधाचे संकलन करण्यासाठी सहकार्य करावे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या दूधाचा प्रश्न मार्गी लागला जाईल. यामुळे होणारे आर्थिक नुकसानही टळेल अशी अपेक्षा व्यक्त करतानाच दूधाला हमीभाव मिळावा यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला असून,केंद्र सहकार मंत्री अमित शाह यांची आपण व्यक्तिगत भेट घेवून याबाबत लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्याची विनंती आपण केली असल्याचे ना.विखे पाटील यांनी बैठकीत सांगितले.

राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकार आतिशय संवेदनशिल असून, दूधाला जास्तीत जास्त भाव कसा देता येईल असेच प्रयत्न केले जात आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सर्व पातळीवर उपाय योजना करण्याचे काम सुरु असल्याचे ना.विखे पाटील म्हणाले.

# माझ्या भोळ्या भाबड्या मायबाप जनतेला सुखी ठेव!

## खा.नीलेश लंके यांच्या हस्ते अरणगाव(मेहराबाद)येथे एकादशी महापूजा संपन्न

**नगर : प्रतिनिधी**

**संतांची पावनभूमी असलेल्या नगर जवळील अरणगांव येथे श्री संत बुवाजीबुवा महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या पुण्यभूमीत आषाढी सप्ताह,अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चालू असून आषाढी एकादशीची महापूजा व अभिषेक खा. नीलेश लंके,संदेश कार्ले यांच्या हस्ते संपन्न झाली, यावेळी सरपंच,उपसरपंच,सदस्य,देवस्थानचे पदाधिकारी,विश्वस्त,ग्रामस्थ मोठ्या संख्नेने उपस्थित होते,यावेळी खा लंके व श्री.कार्ले यांचा सन्मान करण्यात आला.**



खा. लंके यावेळी बोलताना म्हणाले सर्व पंढरीच्या भक्तांना,जनतेला आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देतो व पांडुरंगाला प्रार्थना करतो.माझ्या भोळ्या भाबड्या मायबाप जनतेला सुखी समाधानी ठेव, या ठिकाणीच महत्व खूप आहे, येथे आषाढी एकादशीचा उपवास सोडण्यासाठी द्वादशीला साक्षात पांडुरंग आलेले आहे व दरवर्षी या श्री संत बुवाजी बुवा महाराज मंदिरात येतात असे बोलले जाते, आज व उद्याही येथे हजारो भाविक येणार आहेत.या मंदिराची ख्याती दूरवर गेलेली आहे व भविष्यात हे मोठे तीर्थक्षेत्र होणार आहे असेही ते म्हणाले.

येथे दरवर्षी दोन दिवस मोठा उत्सव होत असतो, द्वादशीला परिसरातील व नगरमधील सुमारे २५ हजार भाविक येथे दरवर्षी उपवास सोडण्यासाठी येतात. तर देवस्थान ट्रस्टच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त द्वादशीच्या दिवशी गावातून रथयात्रा काढण्यात येते.

(पान १ वरून)

### विधानसभेला मविआलाच जनतेचा कौल मिळेल

केला आहे. पहिला टप्पा २८ जुलैपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जाण्याचा प्रयत्न राहील. सातारा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत बळ आणि पैशाचा वापर झाला. त्यातच पिपाणी चिन्हाने काही मते खाल्ली. त्यामुळे आमचा उमेदवार काही मताने पराभूत झाला. आताच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत आम्ही ज्या जागा लढविणार आहोत. तेथेच चाचपणी करणार आहे. महाविकास आघाडी एकसंध कशी राहील हे पाहण्यात येते.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना घरात स्थान आहे. पक्षात घेण्यासाठी कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊ, असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे अजित पवार यांची घरवापसी होणार का? असा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी घरात कोणाला घ्यायचे हा खासगी प्रश्न आहे. पण, कार्यकर्ता संघर्ष करतो. त्यांची मते महत्वाची आहेत. अजित पवार यांच्या घरवापसीची चर्चा नाही, असे स्पष्ट केले. तर विशाळगडावरील अतिक्रमणाच्या प्रश्नावर त्यांनी तेथे एकत्रित येऊन ठराविक घरात मारहाण आणि लुटमार झाली. हे राज्याला भूषणावह नाही. कारण ही गंभीर घटना आहे. यामध्ये राज्य शासनाला पूर्ण अपयश आलेले आहे. यामधील दोषींवर कडक कारवाई व्हायला हवी. तसेच विशाळगडावरील अतिक्रमणांविरोधात आमची भूमिका आहे. पण, हे काम पावसाळ्यापूर्वी किंवा नंतर व्हायला हवे होते. तसेच याबाबत पर्यायी व्यवस्था करुन ते काढायला हवे होते, असेही त्यांनी सांगितले.

**पूजा खेडकर प्रकरणात योग्य कारवाई हवी ...**
प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणाबाबतही प्रदेशाध्यक्ष पाटील यांना प्रश्न करण्यात आला. यावर त्यांनी खेडकर यांना चुकीच्या पध्दतीने सर्टीफिकेट देण्यात आली आहेत. वाममार्गाने त्यांनी प्रवेश मिळवला आहे. याबाबत योग्य ती कारवाई झाली पाहिजे, असे सांगितले.

लोकसभेला १४-१५ जागा लढविल्या असत्या पण....
लोकसभा निवडणुकीत आघाडीत राष्ट्रवादीला कमी जागा मिळाल्या. आता विधानसभा निवडणुकीत किती मिळणार असा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर जयंत पाटील यांनी लोकसभा निवडणुकीत १४ ते १५ जागा आम्ही लढवू शकलो असतो. तसेच आमचे खासदारही वाढले असते. पण, आघाडी भक्कम रहावी म्हणून दोन पावले मागे आलो. विधानसभा निवडणुकीत घटकपक्षांना बरोबर घेऊन जागा वाटप होईल, असे स्पष्ट केले.

### बारसकर महाराजांची कार जळाली की जाळली?

केला होता. पंढरपूर मध्ये ये तुला मारतो जाळतो अशा धमक्या येत असल्याचा व्हिडिओ दोन दिवसांपूर्वी बारसकर यांनी सोशल मिडीयावर शेअर केला होता. बारसकर यांनी सोशल मीडियावर पोस्टवर करत पंढरपूरला येणार असल्याचे म्हटले होते. बारसकर यांनी काही महिन्यांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलनावर टीका केली होती. त्यानंतर आपणाला सतत धमक्या येत आहेत, असे बारसकर यांचे म्हणणे आहे. ही कार पेटवण्यात आल्याचा त्यांचा संशय असून, याबाबत ते पोलिसांना अधिकचा तपशील देणार आहेत.

### माळशेज घाट मनमोहक धबधब्यांनी बहरला !

माळशेज घाट बहरला आहे.वर्षाविहार करणाऱ्यांसाठी ही पर्वणीच ठरत आहे. तसेच जसजसे पावसाचे प्रमाण वाढत जाईल, तसतसे माळशेज घाटात लहान-मोठे तीस ते पस्तीसपेक्षा जास्त धबधबे वाहू लागतात. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ व राष्ट्रीय महामार्ग विकास मंडळ यांनी माळशेज घाटात पर्यटकांसाठी ठिकठिकाणी सिमेंट बॉक, लोखंडी पाइपचे कठडे, वेगवेगळ्या ठिकाणी धबधब्यापर्यंत जाण्यास सिमेंट रस्ते, पेव्हर्स ब्लॉकचे रस्ते जे मागील पावसाळ्यात उखडले होते, ते सर्व दुरुस्त केले आहेत. तसेच बसण्यासाठी विशेष व्यवस्था, छत्र्या व धोक्यासाठी सूचना फलक लावले आहे.

**घाट वर्षाविहारासाठी सज्ज**
तसेच याठिकाणी स्थानिक तरुणांनी थाटलेली मक्याच्या कणसांची व इतर रानमेवा विक्रीची दुकाने ही पर्यटकांना भुरळ घालत आहे. चहा, कॉफी, गरम भजी, वडापाव यावर पर्यटक ताव मारताना दिसत आहे. एकूणच माळशेज घाट वर्षाविहारासाठी सज्ज झाला आहे.
मढ गावाच्या पुढे नाकाबंदी
माळशेज घाटात ओतूर पोलिस प्रशासनाने मढ गावाच्या पुढे नाकाबंदी केली आहे. त्यात ओतूर पोलिस मद्यपी व मद्य सेवन करणाऱ्या, मद्य घेऊन जाणाऱ्या पर्यटकांवर कारवाई करत आहेत. यामुळे वाहनचालकांना थोडा त्रास जरी होत असला तरी सुरक्षेच्या दृष्टीने हे पोलिसांचे महत्त्वाचे पाऊल असलेल्याचे मत कुटुंबासह वर्षाविहाराला आलेले पर्यटक व्यक्त करतात.

जबाबदार पर्यटक म्हणून वागावे
माळशेज घाटात कित्येक ठिकाणे धोकादायक आहेत.
सेल्फीसाठी अशा धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे.
प्लॅस्टिक कचरा इतरत्र टाकू नये.
घाटातून धुक्यात वाहन चालवताना गाडीच्या लाइट चालू ठेवाव्या,
वाहतुकीला अडथळा होईल अशा ठिकाणी वाहने उभी करू नये.

### एलसीबीचे पोलीस निरीक्षक आहेर यांच्या मालमत्तेची चौकशी करा

महासंचालक,पोलीस महानिरीक्षक,पोलीस अधीक्षक या सर्वांकडे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्याबद्दल तक्रारी केल्या असून याबाबत अनेक वृत्तपत्रातही बातम्या छापून आलेल्या आहेत. सर्व तक्रारींचा विचार करून सदर पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांची अहमदनगर येथे नेमणूक झाल्यापासून त्यांनी खरेदी केलेल्या त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे घेतलेल्या सर्व स्थावर व जंगम मालमत्तेची चौकशी व्हावी तसेच त्यांच्या बँक खात्यांचीही चौकशी व्हावी. तसेच ते वापरत असलेल्या मोबाईलचे कॉल, एसएमएस, व्हाट्सॲप कॉल व व्हाट्सॲप मेसेजेसची अहमदनगर येथील नेमणूकी पासून ते आजपर्यंतची सविस्तर माहिती घेवून त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी मकासरे यांनी केली आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

### संत निळोबा मंदिर परिसराचे पावित्र्य जपावे

१७ जुलै बुधवार रोजी आषाढी एकादशी होती. ज्यांना शक्य झाले ते ते भाविकजन दिंडीतून; तर कधी अन्य मार्गाने पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गेले. ज्यांना पंढरपूरला जाणे शक्य झाले नाही त्यांनी जवळच्या प्रतीपंढरपूरच्या ठिकाणी पांडुरंगाचे दर्शन घेतले.



पिंपळनेर (ता.पारनेर, जि.अहमदनगर) हे संत निळोबांचे गाव. ते प्रतीपंढरपूर म्हणून प्रसिद्ध आहे. मीही त्या प्रतीपंढरपूरला संत निळोबांच्या दर्शनासाठी गेलो होतो. मुख्य मंदिराच्या दर्शनानंतर मी संत निळोबांच्या वाड्याच्या दर्शनासाठी जात होतो. मुख्य मंदिर आणि वाडा यांच्यामधून एक ओढा आहे. त्या ओढ्याच्या काठाने विविध दुकाने लागली होती. त्या दुकानांच्या पुढेही अन्य दुकानांची रांग होती. दुकानांच्या मधून वाट काढीत काढीत ओढ्यावरचा पूल ओलांडला. वाड्याचे दर्शन घेतले. परतीच्या मार्गाने निघालो. विचार करु लागलो. ओढ्याकाठच्या दुकानांच्या मधला रस्ता ओबडधोबड आणि उंचसखल आढळला. शिवाय खड्ड्यांत मधून मधून गाळचिखलही होता. ओढा वाहताना दिसला नाही. पाणी थबकलेले दिसले. ओढ्याच्या पात्रात गवत आणि झाडे वाढलेली दिसली. भाविकांच्या गाड्या उभ्या करण्यासाठी निदान हंगामी गाडीतळाची व्यवस्था दिसली नाही. प्रसादभक्षण झाल्यावर रिकाम्या कागदी प्लेटी अस्ताव्यस्त पडलेल्या आढळल्या.
प्रतीपंढरपूर पिंपळनेर तीर्थक्षेत्राला सदर कमतरता शोभणाऱ्या नाहीत. मंदिराच्या विश्वस्त मंडळींनी या सुंदर मंदिराच्या परिसराचे पावित्र्य जपावे, ही विनंती.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# शिर्डी साई मंदिरात गुरूपौर्णिमा उत्सवाची तयारी पूर्ण

## साईभक्तांच्या दर्शन व निवासाची व्यवस्था

**शिर्डी : प्रतिनिधी**


**गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त साईबाबा संस्थानतर्फे सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार (ता. २०) ते सोमवार (ता. २२) या काळात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा होत आहे. त्यासाठी साईबाबा संस्थानची तयारी पूर्ण झाली आहे. देशाच्या व राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांची दर्शनाची व निवासाची व्यवस्था सुलभ व्हावी, यासाठी साईबाबा संस्थानतर्फे मंदिर परिसरात तसेच निवासस्थाने आदी ठिकाणी ६३ हजार १३३ चौरस फूट मंडप उभारण्यात आलेले आहे.**



पुणे ते शिर्डी येणार्या पालख्यांना थांब्यांचे ठिकाणी साधारण ३६ हजार चौरस फूट पावसाळी मंडप उभारण्यात आलेले आहे. मंदिर व निवासस्थान आणि साईप्रसादालय आदी ठिकाणी येण्याजाण्यासाठी जादा बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे.मागील वर्षी गुरूपौर्णिमा उत्सवात तीन दिवसात साई प्रसादालयामध्ये १ लाख ५४ हजार ९४६ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतलेला आहे. यंदा अंदाजे २ लाख साईभक्त गुरूपौर्णिमा उत्सवात प्रसाद भोजन घेतील, असे नियोजन करण्यात आलेले आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
प्रसूती विभाग: प्रसूती पूर्व तपासणी, संपूर्ण प्रसूती उपचार, अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
गर्भपिशवीचे आजार: अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे, गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी, गर्भपिशवीच्या मुखाचे आजार
Infertility वंध्यत्व उपचार: वारंवार होणारे गर्भपात, लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे, पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडथळा येणे, टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
स्तनांचे आजार आणि उपचार
PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे (म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासी सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

आमची वैशिष्ट्ये
१ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
अत्याधुनिक व सुसज्ज अशी अभ्यासिका
एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र हॉस्टेल व मेस सुविधा
पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# लेझिमाच्या तालात, टाळ मृदुंगाच्या गजरात रंगला किसानचा पालखी सोहळा !

■ आषाढी एकादशीच्या दिवशी पारनेरात पांडुरंगाचा जयघोष ■ विठ्ठल-रुख्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांच्या वेशभूषा लक्षवेधी




■ लेझीम पथक, टाळ मृदुंगाच्या निनादात किसान स्कुलचा पालखी सोहळा उत्साहात पार पडला.

## समतेचा संदेश

**सर्वधर्मीयांचा सहभाग असलेल्या पंढरीच्या वारीमधून सर्वधर्मसमभावाचा मोलाचा संदेश दिला जातो. महाराष्ट्रासह महाराष्ट्राबाहेरील लाखो भाविक पंढरीच्या वारीमध्ये सहभागी होतात. आषाढी एकादशीचे औचित्य साधून किसान शैक्षणिक परिवाराकडून दरवर्षी पालखी सोहळयाचे आयोजन करून समतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला जातो.**

**चंद्रकांत चेडे**
**अध्यक्ष, किसान परिवार**

**पारनेर : प्रतिनिधी**

**सीबीएसई अभ्यासक्रमाच्या किसान इंटरनॅशन स्कुलच्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून आयोजित केलेला पालखी सोहळा लेझिम पथक, टाळ मृदुंगाच्या निनादान भक्तीमय वातावरणात पार पडला. विठठल रूख्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांच्या वेशभुषा केलेले विद्यार्थी या पालखी सोहळयाचे आकर्षण ठरले.**

सकाळी नऊ वाजता संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे, नगरसेवक अशोक चेडे, ऋषीकेश चेडे यांच्या उपस्थितीत पालखीचे पुजन झाल्यानंतर पालखी सोहळयास विठु नामाच्या जयघोषात मोठया उत्साहात प्रारंभ झाला. बाजारपेठेतील ग्रामदैवत श्री भैरवनाथांच्या मंदिरासमोर पालखी सोहळा आल्यानंतर अनेक भाविकांनी पालखीचे पुजन करीत दर्शन घेतले. मुख्य बाजारपेठेतून हनुमान मंदिरापर्यंत पालखी सोहळा पोहचल्यानंतर विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वर माऊलींचा गजर करीत, फुगडया खेळत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

नवी पेठमार्गे पालखी सोहळा पुन्हा शिक्षण संकुलात पोहचल्यानंतर विद्यार्थ्यांना फराळ तसेच फळांचे वितरण करण्यात आले. त्यानंतर भागवत सांप्रदायावर आधारीत सांस्कृतीक कार्यक्रम पार पडला. उपस्थितांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले. पालखी सोहळयात चंद्रकांत चेडे, अशोक चेडे, ऋषीकेश चेडे, किशोर शहाणे, विष्णू भिसे, राजू काणे, शंकर औटी, प्राचार्य राठोर, ऋषीकेश औटी, अविनाश सोमवंशी, सोनिया गुंजाळ, वैशाली भगत, निशा भोर, शेळके यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.

## सर्वधर्मसमभावाचा वारसा

**आषाढी वारी ही महाराष्ट्राची धार्मिक व सांस्कृतीक परंपरा आहे. ज्या वारीमध्ये लहान वा मोठा असा भेदभाव नसतो. केवळ नामजपाने पुण्य मिळते या भावाने लाखो वारकरी या वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्राची ही धार्मिक व सांस्कृतीक परंपरा जपण्याचे काम किसान परिवाराकडून केले जात असून पारनेर शहराचा सर्वधर्मसमभावाचा वारसा किसान परिवाराकडून जपला जातो ही कौतुकाची गोष्ट आहे.**

**अशोक चेडे**
**नगरसेवक**

# डी.बी.एम.स्कूलची वारी, निळोबारायांच्या दारी!

■ चिमुकले वारकरी हरिनामाच्या गजरात दंग ■ दहा वर्षांची परंपरा यंदाही कायम



**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

**चाले हे शरीर कोणाचीये सत्ते कोण बोलविते हरी विन॥**
**देखवी दाखवी एक नारायण तयाचे भजन चूको नका॥**
**तब्बल दहा वर्षांची वारीची पार्श्वभूमी असलेल्या चिमुकल्या वारकऱ्यांनी यंदाही आषाढी एकादशी निमित्त राळेगणसिद्धी येथून सकाळी साडेनऊ वाजता प्रस्थान केले होते.**

पारंपारिक वारकरी वेशभूषेमध्ये माऊलींची दिंडी संत श्री.यादवबाबा यांच्या मंदिर परिसरातून राळेगणसिद्धी गावात पोहोचली जिथे पहिले रिंगण पार पडले. दिंडीस व शाळेच्या उपक्रमास राळेगणसिद्धीचे सरपंच जयसिंग मापारी यांनी शुभेच्छा दिल्या. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी पावल्या सादर केल्या. तसेच कु.श्रावणी मापारी हिने भारुड सादर केले.हरिनाम मुखात घेत विठ्ठल भजनात दंग झालेले चिमुकले वारकरी हळूहळू पुढे सरकत प्रति पंढरपूर म्हणून नावजलेले पिंपळनेर येथे सुमारे बारा वाजता पोहोचले.माऊलींचे भजन,पावल्या,अभंग, गवळणी यांच्या गजराने पंचक्रोशीत जणू भक्तीचा महासागरच लोटला.

वारीचे दुसरे रिंगण संत श्री. निळोबाराय यांच्या मंदिर परिसरात पडले.याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सादर केलेले पावल्या,संत गोरा कुंभार नाट्य नृत्य,फुगड्या,भारुड या सर्व सादरीकरणांचे भाविक भक्तांनी मनापासून कौतुक केले. याप्रसंगी कु.भक्ती जऱ्हाड हिने सादर केलेले कीर्तन आणि ९ वी -१० वी च्या विद्यार्थ्यांची फुगडीची जुगलबंदी तसेच विठ्ठल रुक्मिणी वेशभूषेतील विद्यार्थी हे दिंडीचे विशेष आकर्षण ठरले. संपूर्ण दिंडीला श्री संत निळोबाराय मंदिर देवस्थान ट्रस्ट व विश्वस्त मंडळ, पिंपळनेर ग्रामस्थ व सेवेकरी तसेच नारायण गव्हाणचे अक्षय शेळके, गुरुकृपा केटरर्स यांच्या माध्यमातून प्रसादाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी एक मुखाने वदनी कवळ घेता...प्रार्थना करत फराळाचा आनंद घेतला.

यावेळी दिंडीला भेट देत, पद्मभूषण अण्णा हजारे, विश्वनाथ कोरडे तसेच सुभाष पठारे, श्री गाजरे, इतर सरपंच व ग्रामपंचायत सदस्य-पदाधिकारी, पिंपळनेर व जमलेल्या सर्वांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे कौतुक केले व दिंडीच्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. संस्कार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष जे.डी.मापारी यांनी शाळेच्या दहाव्या वर्षात पदार्पण केलेला दिंडीचा उपक्रम हा आपला सामाजिक सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी असून विद्यार्थ्यांनी आपला सांस्कृतिक वारसा जपावा असा बीज मंत्र यानिमित्ताने दिला. शाळेच्या दिंडी उपक्रमासाठी मुख्याध्यापिका शितल मापारी यांचे विशेष सहकार्य तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. परिसरात डी.बी.एम.च्या दिंडीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# निघोजच्या नाभिक समाजाकडून विविध मागण्यांचे निवेदन

मागण्यांवर लवकरच कार्यवाही करण्याची सरपंच वराळ यांची ग्वाही



**निघोज : प्रतिनिधी**

**दशक्रिया विधी घाट येथे नाभिक समाजातील व्यवसायीकांना बसण्यासाठी पत्रा शेड उभे करण्यात यावे तसेच इतर मागण्यांसाठी नाभिक नाभिक समाजाचे शहराध्यक्ष नवनाथ राऊत, उपाध्यक्ष नाना राऊत तसेच मार्गदर्शक दत्तात्रय राऊत यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नुकतीच सरपंच चित्राताई वराळ पाटील यांची भेट घेऊन निवेदन दिले.**

यावेळी नियमीत सोमवारी सुट्टी असलेल्या दिवशी सुट्टी कायमस्वरूपी राहून द्यावी मात्र मोढ्याच्या दिवशी मंगळवारची सुट्टी ग्रामस्थ मागणीचा विचार करून निर्णय द्यावा अशी मागणी करण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, ग्रामविकास अधिकारी संजय पवार नाभिक संघटनेचे पदाधिकारी प्रविण राऊत,नवनाथ राऊत,मनोहर राऊत,जितेंद्र राऊत, राजेश राऊत, नाना राऊत,सोपान राऊत, दत्तात्रय राऊत, मयुर राऊत,योगेश राऊत,सुनिल राऊत,सुखदेव राऊत,सागर आतकर,किरण राऊत,भाऊ राऊत,आशुतोष राऊत, पोपट राऊत,विनायक राऊत,अभिषेक राऊत,सागर राऊत,शशी राऊत,गंगाराम सोनवणे,दशरथ सोनवणे,संदिप जाधव,नितीन शेळके, शैलेश राऊत,स्वप्निल आतकर आदी उपस्थित होते.

सरपंच वराळ पाटील यांनी यावेळी निवेदनात केलेल्या मागण्यांचा विचार करून लवकरच कार्यवाही करण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे.

# ढोकेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

प्लेसमेंट कॅम्पमधून विद्यार्थ्यांची निवड

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**श्री.ढोकेश्वर महाविद्यालयात नुकत्याच प्लेसमेंट विभागामार्फत पदवीधर पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. या मुलाखतीसाठी क्लासिक व्हील, आयसीआय बँक, एक्साईड बॅटरी, यशस्वी ग्रुप, ब्रेन सीटर, या प्रा. लिमिटेड कंपनीने सहभाग घेतला होता. या मुलाखत प्रक्रियेत महाविद्यालयातील आजी व माजी ११० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.यातील निवडक विद्यार्थ्यांची निवड या कंपनीने केली आहे.**




महाविद्यालयात प्लेसमेंटसेल मार्फत वर्षभर विविध उपक्रम आखून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी विषयी उद्बोधन केले जाते. व महाविद्यालयात विविध रोजगाराचे कॅम्प आयोजित केले जातात. त्यामुळे विविध प्रा. लिमिटेड कंपन्या टाकळी ढोकेश्वर या ग्रामीण महाविद्यालयात येतात व गरजू व कार्यप्रवण विद्यार्थांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. या प्लेसमेंट कॅम्पमधून चेडे संकेत, ढोले प्रवीण, रेपाळे संतोष, शेख अबुझर, देशमुख ऋतुजा व साळवे ज्ञानेश्वर यांची विविध प्रा. लिमिटेड कंपनीत निवड झाली आहे.

तसेच पावडे प्रणय, गायकवाड दर्शन, प्रतिक खांडके सैन्यदल, भामरे सोनाली पोलीसदल, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी शिंदे संतोष, जेल विभाग, चेमटे रोहिणी,रोहाकले अर्जुन प्रतिक माने पोर्टल द्वारे शिक्षक भरती, वाघुंडे प्रवीण आरोग्य सेवेत निवड झाली आहे. तर गायत्री ठुबे सीही विद्यार्थिनी सीए इंटर परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.

प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांचे मार्गदर्शन व प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. संजय गायकवाड सतत केलेले प्रयत्नामुळे हे यश मिळाले आहे. असे सांगून संस्थेचे विश्वस्त सीताराम खिलारी , संस्था कार्यकारणी सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी , प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर व उपप्राचार्य वीरेंद्र धनशेट्टी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# वराळ यांच्या नेतृत्वाखाली विकासकामे मार्गी

उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे यांची माहिती



**निघोज : प्रतिनिधी**

**संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू असून गेली चार वर्षात कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली असल्याची माहिती उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे यांनी दिली आहे.**

निघोज येथील लामखडे वस्ती येथील भुमिगत गटार योजनेचा शुभारंभ सचिन वराळ पाटील, निघोज सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब लामखडे यांच्या हस्ते तसेच बाजार समितीचे माजी उपसभापती बबुशा वरखडे यांच्या अध्यक्षतेखाली शुभारंभ करण्यात आला.या विकासकामांना ९ लाख रुपये खर्च होणार असून या भुमिगत गटार योजनेचा फायदा लामखडे वस्ती, वरखडे वस्ती, शेटे वस्ती तसेच निघोज - वडनेर रस्त्यानजीक असलेल्या लोकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

यावेळी माजी उपसरपंच रामदास रसाळ, ग्रामपंचायत सदस्य शंकर पाटील वरखडे, सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण, ग्रामपंचायत माजी सदस्य भिमराव लामखडे, जय बजरंग मंडळाचे पदाधिकारी अर्जुन लामखडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, शांताराम लामखडे, ग्रामविकास अधिकारी संजय पवार, सहाय्यक कामगार तलाठी सुनिल उचाळे, बबन लामखडे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निघोज व परिसरातील ग्रामस्थ करणार पंढरपूरची स्वच्छता !

ग्रामस्वच्छता अभियानासाठी १११ ग्रामस्थ रवाना




**निघोज : प्रतिनिधी**

**आषाढी यात्रेनंतर निघोज व परिसरातील ग्रामस्थ दोन दिवसांसाठी ग्रामअभियान ग्रामस्वच्छता अभियानासाठी दरवर्षी पंढरपूरला जात असतात. यावर्षी गुरुवार दि.१८ रोजी १११ ग्रामस्थ रवाना झाले असून संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या स्वच्छता मोहिमेसाठी दोन बस रवाना झाल्या आहेत.**


प्रसिद्ध ठेकेदार विलास हारदे, प्रगतीशील शेतकरी विष्णू लाळगे व मळगंगा देवीचे पुजारी ठकाराम गायखे, सेवानिवृत्त फौजदार अशोकराव निकम, भाजपचे पदाधिकारी प्रकाश वराळ तसेच १११ युवक, ज्येष्ठ मंडळी तसेच महिला भगीनी यांचा यामध्ये समावेश आहे. हारदे, गायखे, लाळगे दरवर्षी या मोहिमेचे नियोजन करीत असतात.

या स्वच्छता मोहिमेसाठीचा प्रवास व जेवणाचा खर्च तसेच निवास व्यवस्था यामध्ये सहभागी झालेले स्वत: हे ग्रामस्थ स्वत: करीत असतात.दोन दिवसात जेवढ्या मोठ्या प्रमाणात स्वच्छता होईल त्यासाठी हे प्रयत्नशील असतात. जनतेतून या पंढरपूर ग्रामअभियान ग्रामस्वच्छता अभियान मोहिमेचे कौतुक होत आहे.

# जैन संतांना विहार यात्रेत पोलीस संरक्षण मिळणार

■ आ.तांबे यांच्या मागणीवर गृहमंत्र्यांचे आश्वासन
■ जैन महासंघाचे उपाध्यक्ष प्रसाद कर्नावट यांनी मानले आभार

**खडकवाडी : प्रतिनिधी**



**आमदार सत्यजित तांबे यांनी विधान परिषदेच्या अधिवेशनात जैन समाजाचे विविध प्रश्न उपस्थित केल्यानंतर जैन संतांना विहार यात्रेच्यादरम्यान पोलीस संरक्षण देण्याचे आश्वासन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याबद्दल पारनेर तालुका जैन समाजाच्या वतीने महासंघाचे तालुकाध्यक्ष प्रसाद कर्नावट यांनी गृहमंत्री फडणवीस व आ. तांबे यांचे आभार व्यक्त केले आहे.**

जैन समाज हा भारतातील एक अल्पसंख्याक समुदाय असून भारतातील जैन देशाच्या अर्थव्यवस्थेच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. अल्पसंख्यांक समुदाय या नात्याने मला सभागृहाचे लक्ष भारतीय जैन संत किंवा भिक्षूंच्या रक्षणाच्या अत्यंत महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्नाकडे वेधायचे असल्याचे सांगत आ.तांबे म्हणाले की ,जैन समाजात त्याग, भक्ती व निस्वार्थ सेवेमुळे जैन संतांना त्यांच्या समाजात सर्वोच्च स्थान आहे. हे संत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कोणत्याही मोटर वाहनाचा वापर न करता चालून प्रवास करतात. दुर्दैवाने अशी विहार यात्रा असताना जैन संत सुरक्षित नसल्याचे वेळोवेळी आढळून आले आहे.

विहार यात्रा करत असताना जैन संतांना अनेक वेळा अपघातांना सामोरे जावे लागले अनेक वेळा भीषण अपघातामुळे संतांचे अपघाती निधन होते. त्यामुळे महाराष्ट्र समाज उभारणीत संतांचा फार मोठा वाटा असतानाही विहार यात्रेत त्यांचे रक्षण ही करू शकत नाही. अशी भावना जैन समाजात वाढीस लागत आहे. त्यामुळे जैन संतांना विहार यात्रेत पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी आ.तांबे यांनी विधान परिषदेमध्ये केली होती.

आ.तांबे यांनी केलेली मागणी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व सरकारने तत्काळ मान्य करून संबंधित विभागाला निर्देश दिल्याबद्दल पारनेर तालुका जैन महासंघाचे उपाध्यक्ष प्रसाद कर्नावट यांनी व जैन समाजाच्या वतीने आमदार सत्यजित तांबे व उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व सरकारचे आभार मानण्यात आले.

# पिंपरीच्या शाळेचे लौकिकास साजेसे यश!

■ शिष्यवृत्ती परीक्षेत ११ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत ■ दोघांना नवोदय विद्यालयात प्रवेश

**पिंपरीजलसेन : प्रतिनिधी**

**गुणवत्तेसाठी जिल्हयात नावलौकिक असलेल्या पिंपरीजलसेन येथील जिल्हा परिषदेच्या शाळेने आपल्या नावलौकिकास यश संपादन करीत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला. या शाळेचे ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हयाच्या गुणवत्ता यादीसाठी पात्र झाले असून दोघा विद्यार्थ्यांची केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयातील शिक्षणासाठी निवड झाली आहे.**

गुणवत्ता तसेच विविध स्पर्धा परिक्षांमधील यशात सातत्य ठेवणारी पिंपरीजलसेनची शाळा उपक्रमशील शाळा म्हणून जिल्हयात लौकिकास पात्र ठरली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक सतिश भालेकर, रत्नमाला नरवडे, मल्हारी रेपाळे, शारदा तांबे, जयप्रकाश साठे, मंगल हराळ, प्रियंका हजारे यांचे मुख्याध्यापक देवराम पिंपरकर, केंद्रप्रमुख दौलत येवले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप अडसरे, सरपंच सुरेश काळे, उपसरपंच वर्षा पानमंद, निवृत्त पोलीस निरीक्षक अनिल वाढवणे, शिक्षण विस्तार अधिकारी रावजी केसकर, गटशिक्षणाधिकारी सिमा राणे, जिल्हा बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी अभिनंदन केले.




■ पिंपरीजलसेन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या लौकिकास साजेसे यश संपादन केले.

## ५ वर्षात ७२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**विविध उपक्रम राबविण्यात येऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्याचा नेहमीच प्रयत्न करण्यात आल्याने गेल्या पाच वर्षात या शाळेचे इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत तब्बल ७२ विद्यार्थी चमकले आहेत. तर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांची संख्या ११ वर पोहचली आहे. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पाचवीचे ११ विद्यार्थी गुणवत्ता यादीत तर दोघांनी नवोदय प्रवेश परीक्षेत यश संपादन केले आहे.**

## हे आहेत गुणवंत विद्यार्थी

**स्वरदा गणेश गायकवाड व सर्वेश्वरी नितिन बेलोटे या विद्यार्थीनी जवाहर नवोदय विद्यालयातील शिक्षणासाठी निवड झाली आहे तर शिष्यवृत्ती परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत स्वरदा गणेश गायकवाड २५०, आरजू रमीज शेख २४८, निसर्ग ओमप्रकाश देंडगे २४६, अथर्व शंकर लंके २४२, आर्यन ज्ञानेश्वर वरखडे २३८, स्वरा ज्ञानेश्वर रसाळ २३६, साई अनिल शिंदे २३४, मानसी सिताभाऊ कवडे २२२, स्वराज संतोष रेपाळे २२२, आर्या सुरेश वाव्हळ २१८, परिघा संदीप शिंदे २१८.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com